सूचना का अधिकार

महा पारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादीत
**(CIN No. U40109MH2005SGC153646)**


प्रेषक,
**कार्यालयाचे नाव**—कार्यकारी अभियंता, म.रा.वि.पा.कं.मर्या.,
**कार्यालयाचे पत्ता**— प्रशासकीय इमारत अ.उ.दा.सं.व सु.विभाग सांगली,
विश्रामबाग,ता. मिरज, जि. सांगली ४१६४१५
**कार्यालयीन क्रमांक**—०२३३—२३०५८१६
(का)०२३३—२३०४८७२ (वै) ०२३३—२३०४८७३ (फॅ)
**E-mail ID-** ee3120@mahatransco.in वेबसाईट.www.mahatransco.in


का.अ./अ.उ.दा. सं.व सु /विभाग/सांगली/तां/ No 01280 दिनांकः— 26 OCT 2021

## जाहीर नोटीस

महापारेषण अउदा संवसु विभाग,सांगली अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२१—२०२२ करीता वीजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर अउदा संवसु विभाग, सांगलीच्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमाकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत **दि.११.११.२०२१(२३.५९)**पर्यंत राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमांकावर करणेत यावी.

| अस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| E09162700112<br>Location : EHV O&M Dn Sangli | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा— ३७ |

शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत :परिशिष्ट अ

(सौ एस डीं शेटये)
कार्यकारी अभियंता
अ.उ.दा.सं. व सु. विभाग सांगली

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादीत

कार्यालयीन क्रमांक -०२३३-२३०५८१६ (का) (महाराष्ट्र शासन अंगीकृत) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.पा.कं.मर्या.,

वेबसाईट: www.mahatransco.in CIN No.U40109MH2005SGC153646 अ.उ.दा. सं. व सु. विभाग सांगली (विश्रामबाग)

email. ee3120@mahatransco.in

परीशिष्ठ—अ

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नांव व पत्ता | महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, अ.उ.दा. सं.व.सु. विभाग सांगली |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| ३. | अर्जदाराने कोणत्या अधिका—याला भेटावे त्यांचे पदनाम | उप व्यवस्थापक (मासं) |
| ४. | निवड पध्दत | गुणवत्तेनुसार |
| ५. | क) भरावयाच्या पदाचे नांव व संख्या | वीजतंत्री पदसंख्या: ३७ |
| | ख)शिकाउ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | वीजतंत्री पदसंख्या: १ वर्ष |
| | ग) विदयावेतन | शासकीय धोरणानुसार |
| ६. | शैक्षणिक अर्हता | |
| | वीजतंत्री | इ.१० वी उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधून आय.टी. आय वीजतंत्री परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ७. | राखीव पदे | राज्यांच्या आरक्षण धोरणानुसार |
| ८. | भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविणेत येईल. | १) जे उमेदवार www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करतील त्यांचेच अर्ज विचारात घेतले जातील.<br><br>२)आय.टी.आय.उत्तीर्ण गुण व एस.एस.सी.उत्तीर्ण गुण यांना प्रत्येकी (आय.टी.आय. व एस.एस.सी.) यांचे ५०टक्के वेटेज घेवून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.<br><br>३)राज्य शासनाच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणनुसार निवड यादी तयार केली जाईल.<br><br>४)निवड झालेल्या पात्र उमेदवारांना विभागीय स्तरावरून बोलवून कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.<br><br>५)निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शैल्यचिकित्सालय यांच्याकडून वैदयकिय चाचणी करून घेणे बंधनकारक |

| | | |
|---|---|---|
| | | राहील.<br>६)कॉन्ट्रॅक्ट रजिस्टर शिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवार होण्यास पात्र ठरणार नाही. |
| ९. | वयोमर्यादा | किमान १८ वर्षे पूर्ण |
| १०. | शिकाउ उमेदवार पदे भरवयाची अंतिम तारीख | दि.११.११.२०२१ (२३:५९) पर्यतचे अर्ज |
| ११. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १) उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासून घेणेची जबाबदारी उमेदवाराची असेल.<br><br>२) ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी.उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहिती भरावी.<br><br>३)एस.एस.सी.गुणपत्र/प्रमाणपत्र , शाळा सोडल्याचा दाखला व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र/प्रमाणपत्र(चारहीसेमिस्टरची) सांक्षाकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थि दुर्बल घटक(**EWS**)मधुन अर्ज केला तर (**EWS**)प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक असेल.<br><br>४) शिकाऊ उमेदवारांची सही,पालकांची सही,प्रवर्ग,जन्मतारीख,एस.एस.सी मार्क,आयटीआय मार्क,ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.<br><br>५) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका—याकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.<br><br>६) शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (**Online**) अर्ज करताना पोर्टलवर फोटो,मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन (**Online**) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.<br><br>७) प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे याबाबत कोणतीही गैरवर्तणूक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील. |

| | | |
|---|---|---|
| | | ८) प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची ) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील.<br><br>९) जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पूर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| १२. | इतर संबंधित माहिती | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशतः बदल किंवा संपूर्ण रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |

(सौ.एस.डी.शेटये)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,सांगली